Publication: Lokmat
Date: 15/2/2019
Page: 3
Column: 8

लोकमत मुंबई, शुक्रवार, दि. १५ फेब्रुवारी २०१९

# 'इलेक्ट्रिक स्माइल्स' कॅशलेस पेमेंटला चालना देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरात वीज पुरवठा करणाऱ्या अदानी वीज कंपनीने ग्राहकांना रिवॉर्ड मिळवून देत असलेल्या 'इलेक्ट्रिक स्माईल' या उपक्रमाची गुरुवारी घोषणा केली. चेक, वेबसाईट, मोबाईल ॲप आणि इतर ऑनलाईन पेमेंटद्वारे वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांना 'इलेक्ट्रिक स्माईल' कमाविता येतील. प्रत्येक 'इलेक्ट्रिक स्माईल'चे मूल्य एक रुपया असेल. चेक पेमेंट केले तर दर शंभर रुपयांमागे दोन 'इलेक्ट्रिक स्माईल' मिळतील. ऑनलाईन पेमेंटसाठी दर शंभर रुपयांमागे तीन 'इलेक्ट्रिक स्माईल' मिळतील. यात प्रॉम्प्ट पेमेंट इन्सेटिव्ह योजनाही आहे. बिल तयार होण्याच्या म्हणजेच जनरेशनच्या तारखेनंतर सात दिवसांच्या आत बिलाचा ऑनलाईन भरणा करणाऱ्या ग्राहकांना दर शंभर रुपयांमागे चार 'इलेक्ट्रिक स्माईल' मिळतील. फूड ॲण्ड बेव्हरेजेस, होम फर्निशिंग, कपडे, आरोग्य, वेलनेस, ॲक्सेसरी अशा प्रकाराच्या खरेदीसाठी या स्माईल्स वापरता येतील.